# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-26.07.2026** **वार- रविवार**

---

**<u>कारगिल</u>**

कारगिल विजय दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे रक्षण करणाऱ्या वीर जवानांच्या असीम धैर्याला आणि अतुलनीय निष्ठेला कृतज्ञतापूर्वक नमन केले आहे. अत्यंत कठीण आणि प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या सैनिकांनी दाखवलेले शौर्य संपूर्ण देशासाठी कायमच अभिमानास्पद राहील, सैनिकांची ही देशभक्ती आणि समर्पणाची भावना येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी ठरेल, असे पंतप्रधानांनी नमूद केले. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत त्यांनी गाजवलेले शौर्य देशासाठी सदैव अभिमानाची गोष्ट राहील. त्यांची देशसेवा आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा येणाऱ्या प्रत्येक पिढीला अशीच प्रेरणा देत राहील असंही मोदी यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे.

**<u>जोशीकार्यभार</u>**

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज कर्तव्य भवन इथं शिक्षण मंत्रालयाचा पदभार स्विकारला. जोशी यांच्याकडे ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण आणि नवीन तसंच नवीकरणीय उर्जा या केंद्रीय मंत्रालयांचीही जबाबदारी आहे.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयाची आढावा बैठक पार पडली, ज्यामध्ये त्यांनी विविध योजना आणि उपक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरीदेखील या बैठकीला उपस्थित होते.

**<u>गरीबउपचार</u>**

आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही गरीब रुग्णाचे वैद्यकीय उपचार थांबू देणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते आज नागपूरमध्ये मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे आयोजित महाआरोग्य शिबिरात बोलत होते. राज्य शासनाने महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा विस्तार करून गंभीर आजारांचा समावेश केला असून, काही आजारांसाठी ३५ लाख रुपयांपर्यंत मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या दीड वर्षांत ५७ हजार रुग्णांना ४ शे ५२ कोटी रुपयांची मदत देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कर्करोगावरील औषधांचा खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. १५ ते २२ जुलै या काळात शहरात विविध ठिकाणी आयोजित शिबिरांमध्ये ३१ हजार रुग्णांची तपासणी झाली असून साडेचार हजार शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदि यावेळी उपस्थित होते.

**<u>पवना</u>**

पुणे जिल्ह्यातील पवना धरण ९७ टक्के भरल्याने धरणातून नदीपात्रात सध्या ७ हजार ५०० क्युसेक विसर्ग सुरू असून, धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी तो ९  हजार क्युसेकपर्यंत वाढवण्यात येणार आहे. पाणलोट क्षेत्रात आणि घाटमाथ्यावर सुरू असलेल्या पावसामुळे हा विसर्ग टप्प्याटप्प्याने १२ हजार क्युसेकपर्यंत वाढण्याची शक्यता जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे पवना नदी खोऱ्यातील नागरिकांनी सतर्क राहत शेतीची अवजारे, कृषी पंप आणि जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवावीत. अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.

**मसाप**

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीला वेग आला असून, महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे महाराष्ट्रासह देश-विदेशात ९९ नांदी साहित्य संमेलने आयोजित करण्यात येणार आहेत. या नियोजनासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज शाखा पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा झाली. यावेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी, हे संमेलन केवळ साहित्यिकांचा मेळा न राहता मराठी भाषा, संशोधन, नवसर्जन, युवा पिढी आणि समाजाला जोडणारा व्यापक सांस्कृतिक उत्सव ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. विद्यापीठ मराठीच्या प्रचार-प्रसारासाठी तन, मन आणि संसाधनांसह सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यशाळेत ९९ नांदी संमेलनांची रूपरेषा, आयोजन आणि विविध विषयांवरील संमेलनांचे नियोजन यावर चर्चा झाली. राज्यातील विविध भागांतून २०० प्रतिनिधी या कार्यशाळेला उपस्थित होते.

**पुणेविद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत शैक्षणिक गुणवत्ता वाढ, उद्योग-विद्यापीठ सहकार्य , नवे अभ्यासक्रम आणि विद्यार्थी कल्याणाशी संबंधित निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभाग, नवीन अभ्यासक्रम आणि नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत अंतर्गत नवीन अभ्यासक्रमांना मंजुरी, १२७ वा पदवीप्रदान समारंभ आदि मुद्यांवर या बैठकीत निर्णय घेण्यात आले.

**पुरस्कार**

वंचित विकास संस्थेतर्फे संस्थापक दिवंगत विलास चाफेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा यंदाचा 'विलास चाफेकर स्मृती पुरस्कार' कल्याणी ग्लोबल इंजिनिअरिंगचे कार्यकारी संचालक श्रीनिवास कानडे यांना आज पुण्यात झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. समाजातील वंचित घटकांना मदतीचा हात देऊन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रत्येकाने आपल्या परीने खारीचा वाटा उचलणे आवश्यक असल्याचं मत कानडे यांनी यावेळी व्यक्त केलं. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित 'करावा विठ्ठल' या सांस्कृतिक कार्यक्रमानेही उपस्थितांना भक्तिरसाचा अनोखा अनुभव दिला.

**हवामान**

हवामान विभागाने मध्य महाराष्ट्रात आज मुसळधार पावसाचा 'रेड अलर्ट' जारी केला आहे. पुणे शहर आणि परिसरात आज हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. कमाल तापमान २८ तर किमान तापमान २२ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही याच स्वरुपाचं हवामान राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविधभारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.**